
# प्रसूतीपूर्व तयारी- दवाखान्यात व घरी होणाऱ्या प्रसूतीसाठी



महिला व बालविकास मंत्रालय,
भारत सरकार, २०१८

20






# आढाव्यासाठी प्रश्न

## महिलेला प्रसूतीपूर्वी आणि प्रसूती नंतर लगेच भेटणे

**बैठकीच्या सुरुवातीला सर्व कार्यकर्त्यांचे स्वागत करा.**
**सुरुवातीला आपण मागच्या महिन्यातील उपक्रमांचा आढावा घेऊया, असे त्यांना सांगा.**

**त्यांना विचारा की;**
मागील महिन्याचे कृतीचे मुद्दे कोण कोणते होते?


**उजवीकडच्या रकान्यात दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे उपक्रमांचा आढावा घ्या**

- मागील महिन्यात प्रसूत झालेल्या सर्व महिलांना तुम्ही त्यांच्या प्रसूतीपूर्वी भेटू शकलात का? नसल्यास, का नाही?
- मागील महिन्यात प्रसूत झालेल्या महिलांना तुम्ही त्यांच्या प्रसूतीनंतर किती दिवसांनी भेटलात?
  - → जन्माच्या वेळी तुम्ही उपस्थित राहू शकताल का? (नसल्यास, का नाही?)
  - → जन्माच्या दिवशी तुम्ही भेटू शकलात का? (नसल्यास, का नाही?)
  - → प्रसूती नंतर दवाखान्यातून घरी परत आलेल्या दिवशी तुम्ही त्यांना भेटलात का? (नसल्यास, का नाही?)
- प्रसूती दरम्यान किंवा नंतर कुणा महिलेला काही समस्या आली का? या समस्येची सोडवणूक करण्याची तयारी कुटुंबाने केली होती का?
- जन्माच्या नंतर कुटुंबांनी नवजात बालकांना त्वरित देखभाल योग्य प्रकारे दिली का? त्यांनी कोणत्या वेगळ्या गोष्टी केल्या?
  - → लगेच स्तनपान, स्तनपानाशिवाय दुसरे काहीही न देणे
  - → बाळाला उबदार वातावरणात ठेवणे किंवा उबदार ठेवणे
  - → नाळ स्वच्छ करण्याची रीत/ नाळ स्वच्छ ठेवणे

**मागील महिन्यातील कृतीचे मुद्दे**

- अ गटातील सदस्यांनी डाटा ट्रान्सफरशीट मधून आपल्या गृहभेट नियोजन रजिस्टर मध्ये १ वर्षापर्यंतच्या सर्व बालकांची वय व नावे आणि सध्या गरोदर असलेल्या महिलांची नावे भरावीत.
- ब गटातील सदस्यांनी आपापल्या कार्यक्षेत्रातील ज्या बालकांची व गरोदर महिलांची नावे सुटलेली आहेत ती गृहभेट नियोजन रजिस्टर मध्ये भरण्याचे काम पूर्ण करावे.
- कॅलेंडर मंथच्या जागेवर सर्व बालके व गरोदर मातांची तारीख लिहावी. पुढील महिन्यात ज्यांची प्रसूतीची तारीख असेल अशा सर्व महिलांना आपल्याला भेटायचे आहे.
- याच महिलांना आपण प्रसूती नंतर पुन्हा भेटायचे आहे.






# आढाव्यासाठी प्रश्न

## महिलेला प्रसूतीपूर्वी आणि प्रसूती नंतर लगेच भेटणे

- गृहभेट नियोजन रजिस्टरमध्ये सर्व नावे भरली आहेत का?
- मागील महिन्यात प्रसूत झालेल्या सर्व महिलांना तुम्ही त्यांच्या प्रसूतीपूर्वी भेटू शकलात का?
- मागील महिन्यात प्रसूत झालेल्या महिलांना तुम्ही त्यांच्या प्रसूतीनंतर किती दिवसांनी भेटलात?





# प्रसूतीपूर्व तयारी करणे का महत्त्वाचे आहे?


**प्रसूतीपूर्व तयारीचे सामान्यज्ञान कार्यकर्त्यांना माहिती असेलच. चर्चेतून त्यांचे सामान्यज्ञान समोर आणणे हा उद्देश आहे.**

**कार्ड दाखवा आणि विचारा की;**

- जर कुटुंबाने पूर्वतयारी केलेली नसेल तर काय चुका होऊ शकतात?
- कशाची पूर्व तयारी करायचे हे कुटुंबियांना माहिती आहे काय?
- त्यांना हे समजून देण्यासाठी आपल्याला काय करता येईल?




# प्रसूतीपूर्व तयारी करणे का महत्त्वाचे आहे?




- प्रसूतीसाठी कोणकोणती तयारी करून ठेवणे आवश्यक आहे?

- सर्वसाधारणपणे कुटुंबांकडून कोणती तयारी केली जाते, कोणती तयारी करायचे राहून जाते?








# दवाखान्यातील प्रसूतीची पूर्वतयारी

**स्पष्ट करा;**

बहुतेक कुटुंबे दवाखान्यात प्रसूती करण्याचेच ठरवतील. तर काही जण घरी प्रसूती करण्याचेही ठरवू शकतात. घरी प्रसूती करणाऱ्यांना ही ऐनवेळी काही अडचण आल्यास दवाखान्यात जायला लागू शकते. त्यामुळे प्रत्येक कुटुंबाने दवाखान्यात जाण्याची पूर्वतयारी केली पाहिजे.

**कार्ड दाखवा.एका कार्यकर्तीला त्यावरील यादी वाचून दाखवायला सांगा.प्रत्येक मुद्द्यावर सविस्तर चर्चा करा.चर्चे करिता उजवीकडे दिलेल्या चेकलिस्टचा उपयोग करा.शक्यतो वर स्थानिक भाषेचा वापर करून स्पष्ट करा. नियोजनाचे तपशील प्रत्येक गावाप्रमाणे वेगवेगळे असू शकतात.**

**यादीवर चर्चा करून झाल्यावर त्यांना विचारा की;**

यात काही राहून गेले आहे का?

**चर्चेच्या शेवटी विचारा की;**


कुटुंबांकडून अशी सर्वतयारी करून ठेवली जाते का? त्यांना तयारी करायला आपण मदत करू शकतो का?

**पहा - आशा मोड्यूल ६, भाग ब आणि परिशिष्ट ३, आणि आयसीडीएस रजिस्टर ८ मधील संदेशांची सूची;**

- **योग्य दवाखाना**
  - प्रशिक्षित नर्स आणि डॉक्टरांची उपलब्धता
  - २४ तास सेवा
  - रात्री व दिवसा सहज पोहोचता येईल असे
  - आपल्या परिसरात कोणकोणते चांगले दवाखाने आहेत?
- **वाहतूक सुविधा आणि फोन क्रमांक**
  - फोन संपर्क उपलब्ध आहे आणि त्वरित व विश्वासार्ह प्रतिसाद दिला जातो
  - कमी खर्चात किंवा मोफत सेवा
- **माता व बाळासाठी कपडे**
  - मातेसाठी पॅडस् (गरज भासल्यास)
  - बाळाला लपेटण्यासाठी कोरडे, स्वच्छ कापड - किमान दोन तुकडे, आवश्यक असल्यास पांघरूण
- **सोबत जाणारी व्यक्ती**
  - माता व बाळाची देखभाल करणारी व्यक्ती
  - धावपळीची कामे करायला सक्षम व्यक्ती
- **पैसे, खालील जरूरीं करिता**
  - दवाखान्यात जाण्या येण्याचा प्रवास खर्च
  - वैद्यकीय सामानाच्या खरेदीसाठी
  - आपत्कालिन वेळी गरजेसाठी
  - सोबत असलेल्या लोकांच्या जेवणासाठी
- **कागदपत्रे**
  - जननी सुरक्षा योजना / मातृत्व लाभ प्राप्त करण्यासाठी देण्याची आवश्यक कागदपत्रे
- **घराची काळजी घेणारी व्यक्ती**
  - किमान दोन दिवसांसाठी
  - आणखी कशाकशाची काळजी घ्यावी लागेल यावर विचार करावा



# दवाखान्यातील प्रसूतीची पूर्वतयारी



- कोणत्या दवाखान्यात जाणे योग्य ठरेल?
- कोणते वाहन वापरायचे? कोणत्या नंबरशी संपर्क करून
- वाहन बोलावता येते?
- माता व बाळासाठी कोणकोणते कपडे लागतील?
- सोबत कोण येणार?
- बरोबर किती पैसे असावे लागतील?
- कोणती कागदपत्रे न्यावी लागतील?
- माता दवाखान्यात असताना घराची काळजी कोण घेणार?






# घरातील प्रसूतीची पूर्वतयारी

**स्पष्ट करा;**

बहुतेक कुटुंबे दवाखान्यात प्रसूती करण्याचेच ठरवतील. तर काहीजण घरी प्रसूती करण्याचे ही ठरवू शकतात. दवाखान्यात प्रसूती करणाऱ्यांना ही ऐनवेळी घरी प्रसूती करावी लागू शकते. त्यामुळे प्रत्येक कुटुंबाने घरातील प्रसूतीची पूर्वतयारी केली पाहिजे.

**कार्ड दाखवा. एका कार्यकर्तीला त्यावरील यादी वाचून दाखवायला सांगा.प्रत्येक मुद्द्यावर सविस्तर चर्चा करा.चर्चे करिता उजवीकडे दिलेल्या चेकलिस्टचा उपयोग करा. शक्यतोवर स्थानिक भाषेचा वापर करून स्पष्ट करा.नियोजनाचे तपशील प्रत्येक गावाप्रमाणे वेगवेगळे असू शकतात.**

**यादीवर चर्चा करून झाल्यावर त्यांना विचारा की;**

यात काही राहून गेले आहे का?

**चर्चेच्या शेवटी विचारा की;**

कुटुंबांकडून अशी सर्वतयारी करून ठेवली जाते का? त्यांना तयारी करायला आपण मदत करू शकतो का?

**शेवटी हे आवर्जून सांगाकी प्रत्येकाने घरी प्रसूती करण्याची पूर्वतयारी करून ठेवावी, आणि हेच सर्व साहित्य दवाखान्यातील प्रसूतीसाठीही उपयोगी पडू शकते.**

**पहा - आशा मोड्यूल ६, प्रकरण - 2, आणि परिशिष्ट ३, आणि आयसीडीएस रजिस्टर ८ मधील संदेशांची सूची;**

**नवे ब्लेड आणि धागा**

- ब्लेड नवे, काही दिवसांपूर्वीच खरेदी केलेले असावे. नाळ कापायच्या वेळेसच ब्लेडचे पाकीट उघडावे, त्या आधी उघडू नये आणि पाण्यामध्ये नधुता वापरावे.
- धागा - दोन तुकडे, प्रत्येकी सहा इंच लांबीचे, नव्या रीळातील, शक्यतोवर पाण्यात उकळून सूर्यप्रकाशात वाळवलेले.

**साबण**

- प्रसूती करणाऱ्या व्यक्तीला तिचे हात प्रसूतीपूर्व धुण्यासाठी

**स्वच्छ चादर**

- प्लॅस्टीकची, जमिनीवर घाण होऊ नये म्हणून अंथरण्यासाठी
- कापड, प्रसूतीच्यावेळी बाहेर येणारे द्रव व रक्त शोषून घेण्यासाठी

**मातेसाठी स्वच्छ कापड**

- धुतलेले व सूर्यप्रकाशात वाळवलेल्या कापडाचे पॅडस् - किमान सहा

**प्रसूतीसाठी जागा**

- स्वच्छ उजेडाची किंवा दिव्याची सोय असणारी
- स्वच्छ करायला सोपी

**प्रशिक्षित दाई**


- प्रशिक्षित व पात्र नर्स, एएनएम / डॉक्टर
- अशी व्यक्तिजी फोन करून बोलावल्यावर लगेच येऊ शकेल, फोन नंबर उपलब्ध असलेली

**मदतीसाठी महिला**





- प्रसूती करण्यामध्ये मदत करण्याचा अनुभव असलेली महिला





# घरातील प्रसूतीची पूर्वतयारी



- नवीन ब्लेड आणि स्वच्छ धागा
- हात धुवायला साबण
- प्रसूतीच्यावेळी मातेला झोपवायला स्वच्छ चादर (कापडी/प्लॉस्टिक)
- मातेसाठी स्वच्छ कपडा किंवा कापडी पॅडस्
- प्रसूतीसाठी घरातील स्वच्छ, भरपूर प्रकाशाची जागा
- प्रसूतीसाठी प्रशिक्षित व्यक्तीचे नाव तिच्या फोन नंबरसह
- प्रसूती दरम्यान मदतीसाठी अनुभवी महिला




# प्रसूतीपूर्व तयारी - कोणती तयारी कधी करावी

**कार्ड दाखवा आणि प्रत्येकप्रश्नावर चर्चा करा.**
**उजवीकडे दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे चर्चा करा.**


**चर्चा करा की;**

प्रसूतीपूर्व तयारीची सुरुवात गरोदरपणाच्या सुरुवाती पासून करणे केव्हाही चांगले ठरते. विशेषत: प्रसूतीसाठीचा खर्च बाजूला ठेवण्यासाठीची बचत करणे आधीपासून सुरू करावे. बहुतेक कुटुंबांमध्ये डोहाळ जेवण झाले की प्रसूतीचा विचार करायला सुरुवात होते. सर्व पूर्वतयारी नऊ महिन्यापर्यंत पूर्ण होईल याची काळजी घ्यावी.


- गरीब कुटुंबांनी गरोदरपणाच्या सुरुवाती पासूनच बचत करावी लागेल.
- सातव्या महिन्यापर्यंत ब्लेड, धागाआणि कापड तयार ठेवावे, कारण त्यानंतर कधीही प्रसूती होऊ शकते
- सातव्या महिन्यापर्यंत दवाखाना ही शोधून ठेवावा, शक्य असल्यास गरोदर महिलेची प्रसूतीपूर्वी किमान
- एक तपासणी या दवाखान्यात करावी.
- दवाखान्यातील किंवा घरी करायच्या प्रसूतीची सर्व पूर्वतयारी ९ व्या महिन्यापर्यंत पूर्ण करावी.
- अंगणवाडी कार्यकर्ती / आशा यांनी गरोदरपणाच्या तिस-या किमान दोनदा गृहभेट देऊन वरील प्रमाणे
- सर्व तयारी केली आहे का, हे तपासावे:
  - एक गृहभेट ७ व्या महिन्यात, ज्यामध्ये तयारी काय केली आहे हे पाहून आवश्यक सल्ला द्यावा
  - एक गृहभेट ९ व्या महिन्यात, ज्यामध्ये सर्व पूर्वतयारी पूर्ण झाली आहे याची खात्री करून घ्यावी




# प्रसूतीपूर्व तयारी - कोणती तयारी कधी करावी



- कुटुंबाने गरोदपणाच्या कोणत्या कालावधीत प्रसूतीपूर्व तयारीची सुरुवात करावी?
- कोणत्या वेळी प्रसूती पूर्वतयारी करावी?
- कोणत्यावेळी आपण त्यांना तयारी सुरू करण्यास मदत केली पाहिजे?








# सारांश: प्रसूतीसाठी कशाप्रकारे तयारी करावी

**कार्ड दाखवा. सहभागींना त्यावरील सर्व मजकूर, प्रत्येक ओळ वाचायला सांगा.**

**त्यांना सांगा की, आता त्यांनी लक्षपूर्वक ऐकायचे आहे आणि नंतर काही प्रश्न असतील तर विचारायचे आहेत.**



# सारांश: प्रसूतीसाठी कशाप्रकारे तयारी करावी



प्रत्येक गरोदर महिलेच्या कुटुंबाने दोन्ही दवाखान्यातील प्रसूती आणि घरातील प्रसूती या दोन्हीची पूर्वतयारी केली पाहिजे.

पूर्व तयारी लवकर सुरू केली पाहिजे. डोहाण जेवणापर्यंत तर सुरुवात व्हायलाच पाहिजे.


आपण त्यांना तिसऱ्या तिमाहीत किमान दोनदा गृहभेट द्यायची आहे: त्यांनी तयारी सुरू केली आहे का हे पाहायला पहिली भेट आणि त्यांची तयारी पूर्ण झाली आहे का याची खात्री करून घ्यायला दुसरी भेट.

## दवाखान्यातील प्रसूती साठी

- योग्य दवाखाना
- वाहतूक सुविधा त्यांच्या फोन क्रमांकासह
- माता व बाळासाठी कपडे
- सोबत जाणारी व्यक्ती
- पैसे, पुरेसे
- जननी सुरक्षा योजनेसाठी कागदपत्रे
- घराची काळजी घेणारी व्यक्ती

## घरातील प्रसूती साठी

- नवे ब्लेड आणि धागा
- साबण
- स्वच्छ चादर (कापडी/प्लॉस्टिक)
- मातेसाठी स्वच्छ कापड / पॅडस्
- प्रसूतीसाठी जागा
- प्रसूतीसाठी प्रशिक्षित व्यक्तीचे नाव तिच्या फोननंबर सह
- मदतीसाठी महिला



# सराव: प्रसूतीपूर्व तयारी विषयी कुटुंबियांना समुपदेश करण्याकरिता रोल-प्ले

**कार्यकर्त्यांना रोल-प्ले करण्यासाठी मदत करा. कुटुंबियांशी बोलून त्यांनी दवाखान्यातील व घरातील प्रसूतीची पूर्वतयारी योग्य प्रकारे केली आहेका हे तपासणे, या विषयावर हा रोल-प्ले आहे.**

**उजवीकडे दिलेल्या चेकलिस्टच्या मदतीने रोल-प्लेसाठी मार्गदर्शन करा.**


- एका अंगणवाडी कार्यकर्तीला तिच्या क्षेत्रातील ७ महिने गरोदर असलेल्या महिलेची निवड गृहभेट रजिस्टरच्या मदतीने करायला सांगा. तिने बरोबर निवड केली आहे का हे दुसऱ्या कार्यकर्तीला तपासायला सांगा.
- चार जणींना पुढील प्रमाणे चार मुख्य भूमिका करायला सांगा -
  - गरोदर महिला - जि चा ७ वा महिना चालू आहे
  - सासू
  - नवरा
  - अंगणवाडी कार्यकर्ती किंवा आशा
- अंगणवाडी कार्यकर्ती / आशा यांच्यासाठी सूचना: आधी प्रश्न विचारून कुटुंबाने काय तयारी केली आहे हे तपासा आणि नंतर राहिलेल्या गोष्टी करण्यासंबंधी सल्ला द्या.
- साधारण पाच मिनिटे रोल-प्ले पाहिल्यानंतर काय बरोबर होते व काय चुकीचे होते याविषयी त्यांना चर्चा करायला सांगा.
- शेवटी, सहभागींना विचारा की, खालील प्रमाणे झाले असते तर काय चुकीचे घडले असते;
  - कुटुंबाला भेट वा समुपदेशन दिले गेले नसते
  - कुटुंबाला खूप उशीरा भेट दिली किंवा प्रसूतीला काही दिवस बाकी असताना भेट दिली




## सराव:


# प्रसूतीपूर्व तयारी विषयी कुटुंबियांना समुपदेशन करण्या करिता रोल-प्ले

कुटुंबाने प्रसूतीपूर्वी तयारी करावी यासाठी त्यांच्याशी आपण कसे बोलले पाहिजे?









# तिसऱ्या तिमाहीतील गरोदर महिलांना अचूकपणे शोधणे



**कार्ड दाखवा.**

**सर्व सहभागींना त्यांच्या गृहभेट नियोजन रजिस्टरचा वापर करून त्यातील तिसऱ्या तिमाहीतील गरोदर महिला शोधायला सांगा.**
**अशा किती महिला त्यांना सापडल्या (साधारणपणे एका गावात अशा ५-८ महिला असायला पाहिजेत). जर कुणाला शोधायला अडचण असेल तर दुसऱ्या कार्यकर्तीला तिला मदत करायला सांगा.**
**विचाराकी यातील कोणत्या महिलांचा ७ वा महिना चालू असेल आणि कोणत्या महिलांचा ९ वा महिना चालू असेल.**
**सर्व सहभागींना हे समजण्यासाठी उजवी कडील मार्गदर्शक सूचनांचा वापर करा.**
**गरोदरपणाचा महिना माहिती असणे का महत्त्वाचे आहे, आणि जर आपण प्रत्येक गरोदर महिलेची लवकर नोंद केली व LMP व EDD नोंदी अचूकपणे केल्या तर महिना सहज शोधता येतो, हे आवर्जून स्पष्ट करा.**

- गरोदरपणाची तिसरी तिमाही म्हणजे शेवटचे तीन महिने (७, ८व९वामहिना)
- रजिस्टर क्र. ८ (गृहभेट नियोजन) मधील रकाना ४ मध्ये गरोदर महिलेला तिसऱ्या तिमहीत दिलेल्या भेटींची नोंद करायची आहे. या रकान्यात लिहिलेले महिने वापरून कोणत्या गरोदर महिला तिसऱ्या तिमाहीत आहेत हे शोधा.

**उदाहरणार्थ**


- समजा चालू महिना जुलै आहे.
- खाली दिलेल्या उदाहरणामध्ये शकुंतलादेवीची तिसरी तिमाही जून, जुलै व ऑगस्ट अशी आहे. याचा अर्थ ती सध्या तिसऱ्या तिमाहीत आहे.
- यावरून असेही लक्षात येतेकी शकुंतलादेवीचा ७ वा महिना जून मध्ये होता, ८ वा महिना चालू आहे (जुलै) आणि पुढच्या महिन्यात (ऑगस्ट) ९ वा असेल.

- जर गृहभेट नियोजन अचूक केले असेल, तर तिसऱ्या तिमाहीतील सर्व महिला एका खाली एक, त्याच पानावर किंवा शेजारच्या पानावर, सापडतील. अशा प्रकारे नोंदी ठेवल्यास त्यांना शोधणे व त्यांची संख्या मोजणे सोपे जाते.

| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
|---|---|---|---|---|
| कुटुंब आणि व्यक्तीचा क्र. | माता व बालकाचे नाव | गरोदरपणाचा महिना - ४-६ महिने (किमान २ वेळा भेट - कितीही भेटी योग्य) | गरोदरपणाचा महिना - ७-९ महिने (किमान २ वेळा भेट) | जन्माचा दिवस (जन्माच्या वेळी हजर राहणे किंवा जन्मानंतर लवकरात लवकर गृहभेट) |
| कुटुंबक्रमांक | कॅलेंडर प्रमाणे महिना | | | |
| | माता: | | | |
| | EDD | | | |
| | प्रसूतीचीतारीख: | | | |
| क्र. | बालक | | | |




# तिसऱ्या तिमाहीतील गरोदर महिलांना अचूकपणे शोधणे



- सध्या तिसऱ्या तिमाहीत असलेल्या गरोदर महिलांना आपण गृहभेट नियोजन रजिस्टर वरून शोधणार आहोत.

- यातील कोणत्या महिला ७ व्या महिन्यात आहे व कोणत्या ९व्या महिन्यात आहेत हे आपण शोधणार आहोत.




Register 8

IntegratedChildDevelopmentServices

HomeVisitsPlanner

| | Name | Code |
|---|---|---|
| District | | |
| ICDSProject(Block) | | |
| Sector | | |
| Village/Ward | | |
| AnganwadiCentre | | |
| AnganwadiWorker | | |
| AnganwadiHelper | | |

MinistryofWomen&ChildDevelopment
GovernmentofIndia




## कृतीचे मुद्दे

# तिस-या तिमाहीत 2 गृहभेटी दया व प्रसुतिपूर्व तयारीची खात्री करा


**कार्ड दाखवा. सर्व मुद्द्यांची थोडक्यात चर्चा करा.**

**खालील मुद्द्यांवर भर देऊन सांगा**

* ७ व्या महिन्यातील भेटीची वेळ
*९ व्या महिन्यातील भेटीची वेळ
*७ व्या महिन्यातील भेटीमध्ये काही समस्या आढळल्या तर आणखी भेटींची गरज
* जर पूर्वतयारी अपूर्ण असेल तर जास्त भेटींची गरज
* प्रथम प्रश्न विचारा, तयारी किती केली हे तपासा आणि मग सल्ला द्या
* गरज वाटल्यास रजिस्टर ८, आणि आशा मोड्यूल ६, यामधील चेकलिस्ट पहा

**आवश्यकता वाटल्यास 'सारांश' कार्डाच्या सहाय्याने उजळणी घ्या.**





## कृतीचे मुद्दे

# तिसऱ्या तिमाहीमध्ये दोन गृहभेटी करून प्रसूतीपूर्व तयारी केली जाईल याची खबरदारी घ्या.

- आपल्याला गरोदर महिलेची ७व्या महिन्यात तिच्या घरी भेट घ्यायची आहे.
- कुटुंबाला भेटून आपल्याला खालील गोष्टी समजून घ्यायच्या आहेत:
  - त्यांनी दवाखान्यातील प्रसूतीची पूर्वतयारी केली आहे काय?
  - त्यांनी घरातील प्रसूतीची पूर्वतयारी केली आहे काय?
  - प्रसूतीपूर्व तयारीमध्ये घरातील जबाबदार व्यक्तींचा सहभाग आहे काय?
- पूर्वतयारीमध्ये त्रुटी आढळल्यास त्यानुसार आपल्याला मार्गदर्शन करायचे आहे.
- पूर्वतयारी पूर्ण होईल याची खबरदारी घेण्यासाठी ९ व्या महिन्यात गरोदर महिलेची पुन्हा भेट घ्यायची आहे.



1. ही मासिक बैठक कशासाठी?
2. गृहभेट योजना रजिस्टर कसे बनवावे किंवा त्यात माहिती कशी मांडावी. गृहभेटीची सुरुवात
3. अंगणवाडी केंद्रावर आयोजित सामुदायिक कार्यक्रमाचे नियोजन व आयोजन
4. नवजात बालकांच्या स्तनपानाचे निरीक्षण - का व कसे?
5. अशक्त नवजात बालक ओळखणे आणि त्याची देखभाल.
6. वरचा आहार - भोजनातील विविधता
7. महिलांमधील ऍनिमियाचा प्रतिबंध
8. बालकांच्या शारीरिक वाढीचे आकलन
9. वाढत्या वयानुसार वरच्या आहारामध्ये सुधारणा व वाढ
10. फक्त स्तनपानाची खबरदारी घेणे
11. अशक्त नवजात बालकाची देखभाल - शेवटी किती अशक्त बालके आपल्या कडून सुटून जातात?
12. आपणवरच्या आहाराची सुरुवात करण्याच्या वेळेची खात्री कशी करावी?
13. गंभीर अशक्तपणा कसा ओळखावा व थांबवावा?
14. आजारपणा दरम्यान बालकाचा आहार
15. मातेला स्तनपानाशी संबंधित समस्यांसाठी सहाय्य
16. कांगारू मदर केअरच्या मदतीने अशक्त बालकाची देखभाल कशी करावी?
17. आजारी नवजात बालकाचा शोध व संदर्भ सेवा
18. कुपोषण व मृत्यूपासून बचाव करण्यास्तव आजारांपासून संरक्षण
19. बालके व तरुणींमध्ये रक्ताची कमतरता / ऍनिमियाचा प्रतिबंध
20. प्रसुतीपूर्व तयारी - दवाखाना व घरी होणाऱ्या प्रसूती साठी
21. गर्भावस्थे दरम्यानची तयारी - नवजात बालकाची देखभाल व कुटुंब नियोजन

